MHPU290005702026

**फौजदारी जामीन अर्ज क्र. २०६/२०२६**
**निशाणी ०१ वरील आदेश**
( आदेश रोहिदास पडवळ वि. महाराष्ट्र शासन)

अर्जदार **आदेश रोहिदास पडवळ** यांनी हा अर्ज नियमित जामीन मिळणेसाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ***४८३*** नुसार केला आहे.

| | | |
|---|---|---|
| पोलीस ठाणे | - | लोणावळा ग्रामीण पोलीस ठाणे |
| गुन्हा रजिस्टर क्र | - | **१४७/२०२६** |
| कलम | - | भा.न्या.सं. कलम ७८ तसेच लैंगीक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १२ अन्वये |
| गुन्हा दाखल तारीख | - | २९/०५/२०२६ |
| गुन्हा घडल्याची तारीख | - | दि. २०/०४/२०२६ ते दि. २९/०५/२०२६ |
| अटक तारीख | - | २९/०५/२०२६ |
| कलम (जामीन अर्ज) | - | भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८३ नुसार |

नियमित जामिनाचा अर्ज आहे.

२. जामिनाचे मुद्दे -

१. आरोपीविरुध्द प्रथमदर्शनी गुन्हा सिध्द होत नाही.
२. फिर्यादीने अर्जदाराला गुन्हयात खोटया पध्दतीने गोवले आहे.
३. फिर्यादीतील मजकुर हा खोटा, खोडसाळ व बनावट आहे.
४. फिर्यादीतील मजकुर संदीग्ध आहे.
५.
६. फिर्याद दाखल करण्यास विलंब झालेला आहे.
७. फिर्यादीने अर्जदार/आरोपीविरूध्द यापूर्वी लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये गु.र.नं. १२/२०२६ अन्वये गुन्हा दाखल आहे.
८. दि. ११/०४/२०२६ रोजी अर्जदाराला जमीन मंजुर झाला होता.

९. त्या जामीनामुळे रागावून व सुडबुध्दीने फिर्यादीने ही खोटी फिर्याद दाखल केली आहे.
१०. अर्जदार हे शेतकरी असुन कुटुंबाचा एकमेव कमावता सदस्य आहे.
११. अर्जदाराचे वडील निधन पावले आहेत. त्याच्या आईची जबाबदारी पूर्णपणे त्याच्यावर अवलंबून आहे.
१२. अर्जदार/आरोपी दि. २९/०५/२०२६ रोजी आरोपी ट्रॅक्टर चालकासह शेतात नांगरणीचे काम करत होता, ही बाब फिर्यादीला माहित होती. त्याचा फायदा घेऊन फिर्यादीने सुडबुध्दीने खोटी फिर्याद दाखल केली आहे.
१३. अर्जदार/आरोपी हा केवळ २६ वर्ष वयाचा तरुण आहे. त्याला तुरुंगात ठेवल्यास त्याच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.
१४. सदर गुन्हयाचा तपास पूर्ण झालेला आहे.

या व इतर कारणांसह नियमित जामीन मिळावा अशी विनंती केली.

३. तपासी अंमलदाराने त्याचे म्हणणे दि. १८/०६/२०२६ रोजीचे पत्रान्वये दाखल केले आहे. त्यातील नमूद कारणांस्तव जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. त्यांचा युक्तीवाद त्यांनी दाखल केलेले अर्ज, म्हणणे व कथने प्रकरणातील कागदपत्रांशी सुसंगत आहेत.

५. अर्जदार/आरोपी याला दि.२९/०५/२०२६ रोजी अटक केलेली आहे. तेव्हापासून तो तुरुंगात आहे. सदर प्रकरणाचा तपास जवळ जवळ पूर्ण झालेला आहे. या न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्ररकणांची संख्या व त्या निकली काढण्यासाठी लागणारा वेळ पाहता, या प्रकरणाची न्याय चौकशी नजीकच्या काळात पूर्ण होईल याची शक्यता कमीतकमी आहे. वरील सर्व कारणांचा एकत्रीत विचार करता, अर्जदार/आरोपी ला जामीन मिळणे रास्त व योग्य आहे.

७. सबब, हे न्यायालय खालीलप्रमाणे अंतीम आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदाराचा जामीन अर्ज (निशाणी क्र.०१) मंजूर करण्यात आला.

२. अर्जदार/आरोपी **आदेश रोहिदास पडवळ** याने त्याचा स्वतःचा जातमुचलका रक्कम रु.५०,०००/- व तेवढयाच रकमेचा एक किंवा अधिक जामीनदार मुचलक्यासह हजर केल्यास त्याला जामीनावर सोडण्यात यावे.

३. अर्जदार/आरोपी याने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे खटल्यातील परिचित असलेल्या कोणत्याही व्यक्तीला न्यायालय आणि तपासी अंमलदारांना तथ्ये उघड करण्यापासून परावृत्त करण्यासाठी कोणतेही प्रलोभन, धमकी किंवा आश्वासन देऊ नये.

४. अर्जदार/आरोपी याने पुरावे आणि साक्षीदारांशी छेडछाड करू नये.

५. अर्जदार/आरोपी याने न्यायालयाच्या आदेशाशिवाय भारत देशाच्या बाहेर जावू नये.

६. अर्जदार/आरोपी याने त्याचा कायमचा पत्ता आणि तात्पुरता पत्ता, जर असेल तर आणि त्यांचे मोबाईल संपर्क क्रमांक इत्यादींचा तपशील न्यायालय आणि तपासी अंमलदार यांना सादर करावेत.

७. अर्जदार/आरोपी हा न्यायालय आणि तपासी अंमलदार यांना पूर्वसूचना दिल्याशिवाय त्यांचा निवासी पत्ता बदलू शकत नाहीत.

८. न्यायचौकशी पूर्ण होईपर्यंत अर्जदार/आरोपी याने महिन्याच्या प्रत्येक आठवडयाच्या शनिवारी संबंधित पोलीस ठाण्यात तपासी अंमलदाराकडे हजेरी लावावी तसेच महिन्याच्या प्रत्येक दुसऱ्या सोमवारी संबंधित न्यायालयात हजर राहावे.

९. अर्जदार/आरोपी आणि जामीनदाराने जामीन सादर करताना घरकर पावती, पाणीकर पावती आणि लाईट बिलाच्या नवीनतम देयक पावतीची मूळ प्रत त्यांच्या नावावर किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावर असलेली, पॅनकार्ड, आधारकार्ड, त्याच्या घरातल्या इसमांच्या नावे असलेल्या घरमिळकती, शेतजमिन मिळकती इ.चे मालकी हक्काचे दस्ताऐवज उदा. ७/१२ उतारा, लिस्ट ऑफ असेसमेंट, पाणीपट्टी, घरपट्टी, एल.पी.जी. गॅस कनेक्शन असलेल्या कार्यालयाचे नाव व पूर्ण पत्ता, त्यांचे मूल ज्या शाळेत शिकतात यांचा नाव व पूर्ण पत्ता इत्यादींचा तपशील

न्यायालय आणि तपासी अंमलदार यांना सादर करावेत. जामीनदार हा आरोपीच्या कुटुंबातील सदस्य असणे आवश्यक आहे.

१०. अर्जदार/आरोपी याने जर वरीलपैकी कोणत्याही अटींचे उल्लंघन केले तर त्यांचा हा जामीन आपोआप रद्दबातल होईल, त्यासाठी वेगळी कारवाई करण्यात येणार नाही.

११. चार्जशीट दाखल करताना तपासी अंमलदाराने अर्जदार/आरोपीचा जामीन कतबा व दोषारोप न्यायालयात दाखल करीत असल्याची तारीख, वेळ व ठिकाण अशी वर्णने असलेली नोटीस प्रत्यक्ष अर्जदार/आरोपींना तामील करुनच चार्जशीट पाठवावे. त्याशिवाय चार्जशीट स्वीकारली जाणार नाही.

१२. पोलीस ठाण्याला वरीलप्रमाणे कळविण्यात यावे.

DATTATREYA KASHINATH ANBHULE Digitally signed by DATTATREYA KASHINATH ANBHULE Date: 2026.08.07 16:20:06 +0530

दिनांक – ०७/०८/२०२६

(डी. के. अनभुले)
प्रभारी-जिल्हा न्यायाधीश-२ तथा
अति. सत्र न्यायाधीश, वडगाव मावळ, पुणे.

| **CERTIFICATE**<br>"I affirm that, the contents of this PDF file Judgment are same word for word as per original Judgment. | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Shri. D.K. Anbhule<br>Addl. Sessions Judge, Vadgaon Maval. |
| Name of Stenographer | : | Shir. S. M. Limkar (Stenographer- Grade III) |
| Date of Judgment/Order | : | 07/08/2026 |
| Judgment/Order signed by P.O. on: | : | 07/08/2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 07/08/2026 |